# कुंडल येथे राज्यस्तरीय 'क्रांतीअग्रणी वक्तृत्व स्पर्धा'

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त ८ व ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करणेत आलेची माहिती या स्पर्धेचे संयोजक व जि.प. सदस्य शरद लाड यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी प्र.प्राचार्य डॉ.प्रताप लाड, समन्वयक डॉ. धनंजय होनमाने, आदी उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात प्रतिसरकारच्या माध्यमातून योगदान देणारे तुफानसेनेचे फिल्डमार्शल क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड यांनी स्वातंत्रचळवळी बरोबरच समाजाभिमूख अनेक उपक्रम राबविले व सहकार, कृषी, सामाजिक व राजकीय क्षेत्रासंबधीचे विचार अभिव्यक्त केले होते.

त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्रेरणा देणार्या विचारांचा वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांच्या अभिव्यक्तीसाठी एक समर्थ व्यासपिठ मिळवून देण्यासाठी या क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी एक ते तीन क्रमांकासाठी अनुक्रमे सात, पाच व तीन हजार रुपये रोख व स्मृतीचिन्ह असे पारितोषिक असून, पाणी, पसायदान, कृत्रीम बुद्धीमत्ता, सद्दढ विरोधी पक्ष, २१ व्या शतकांतील सांस्कृतीक परिवर्तने, क्रांतिकारकांच्या स्वप्नातील लोकशाही, हरीतक्रांती झाली पण नैसर्गिक शेतीचे काय? आदी विषय आहेत. स्पर्धेचे उदघाटन दादासाहेब मोरे यांचे हस्ते तर रोहित आर.आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व क्रांती ऊद्योग समुहाचे प्रमुख अरुण अण्णा लाड यांचे अध्यक्षतेखाली होणार असून या स्पर्धेकरीता नावनोंदणी ५ ऑगस्ट पर्यंत करावी असे आवाहन स्पर्धेचे स्वागताध्यक्ष व जि.प. सदस्य शरद भाऊ लाड यांनी केले आहे. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.मोहन सदामते, जेष्ठ प्रा.जे.ए.पाटील, डॉ.व्ही.आर.माने, कार्यालय प्रमुख रमेश जंगम आदी उपस्थित होते.

दै. तरुण भारत, ता- 02/08/2019

दै. सकाळ 3/8/19

# कुंडलला क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धा


जी. डी. लाड

कुंडल, ता. २ : येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयातर्फे ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त ८ व ९ ऑगस्टला राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे संयोजक व जिल्हा परिषदेचे सदस्य शरद लाड यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी प्र. प्राचार्य डॉ. प्रताप लाड, समन्वयक डॉ. धनंजय होनमाने आदी उपस्थित होते.

शरद लाड म्हणाले, "भारतीय स्वातंत्र्य लढ्यात प्रतिसरकारच्या माध्यमातून योगदान देणारे तुफानसेनेचे फिल्डमार्शल क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांनी स्वातंत्र्यचळवळी बरोबरच समाजाभिमुख अनेक उपक्रम राबविले व सहकार, कृषी, सामाजिक व राजकीय क्षेत्रांसंबंधीचे विचार अभिव्यक्त केले होते.

त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्रेरणा देणाऱ्या विचारांचा वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांच्या अभिव्यक्तीसाठी एक समर्थ व्यासपीठ मिळवून देण्यासाठी या क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेसाठी एक ते तीन क्रमांकासाठी अनुक्रमे सात, पाच व तीन हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पारितोषिक असून, पाणी, पसायदान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सदृढ विरोधी पक्ष, २१ व्या शतकातील सांस्कृतिक परिवर्तने, क्रांतिकारकांच्या स्वप्नातील लोकशाही, हरितक्रांती झाली पण नैसर्गिक शेतीचे काय ? आदी विषय असून या स्पर्धेचे उद्घाटन य. च. म. मु. विद्यापीठाचे विभागीय संचालक दादासाहेब मोरे यांचे हस्ते तर युवा नेते रोहित आर. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण अण्णा लाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या स्पर्धेकरिता नावनोंदणी ५ ऑगस्ट पर्यंत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या वेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. मोहन सदामते; ज्येष्ठ प्रा. जे. ए. पाटील, डॉ. व्ही. आर. माने, कार्यालय प्रमुख रमेश जंगम आदी उपस्थित होते.

दै. सकाळ, ता- 03/08/2019

# कुंडलमध्ये राज्य वक्तृत्व स्पर्धा

पु 3/8/19

कुंडल: वार्ताहर

येथील क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्यावतीने कुंडल येथे ऑगस्ट क्रांती दिना निमित्त ८ व ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. अशी माहिती जिल्हा परिषद स[illegible] शरद लाड यांनी दिली. या स्पर्धेचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचे विभागीय संचालक दादासाहेब मोरे यांचे हस्ते तर युवा नेते रोहित आर.आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व क्रांती ऊद्योग समुहाचे प्रमुख अरुण अण्णा लाड यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. या स्पर्धेकरीता नावनोंदणी ५ ऑगस्ट पर्यंत करावी असे आवाहनही त्यांनी केले आहे. यावेळी प्र.प्राचार्य डॉ. प्रताप लाड, समन्वयक डॉ. धनंजय होनमाने डॉ.मोहन सदामते, प्रा.जे.ए.पाटील, रमेश जंगम उपस्थित होते.

दै. पुढारी
ता- 03/08/2019